**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३१०७ दि. २७ /०९ /२०१९**

**<u>समर्थ पोलीस स्टेशन पुणे</u>**

**ओळखीचा गैरफायदा घेऊन बारमधील मॅनेजरचे फोन बँकींग सुविधा वापरुन पैशांचा अपहार करणारे**

**ग्राहकास अटक .**

श्री. रमेश देवदत्त जोशी मॅनेजर हॉटेल पीजय , ४४० नानापेठ पुणे हे हॉटेल पिजय बार ॲण्ड रेस्टॉरंट मध्ये नोकरीस आहेत. त्यांचे हॉटेलमध्ये नियमित पणे येणारे ग्राहकांशी त्यांची ओळख होत असते. अशा ग्राहकांपैकी एक असलेला प्रतिक राजेंद्र बोथरा रा. गोकूळनगर कात्रज- कोंढवा रोड, पुणे याने वेळोवेळी रमेश जोशी याचां मोबाईल फोन घरी फोन करण्याचे निमित्ताने मागून घेऊन मोबाईलमध्ये सेव्ह असलेल्या वेगवेगळ्या बँकांचे क्रेडिट कार्डवरुन ,अनाधिकृतरित्या फिर्यादीच्या संमतीशिवाय ऑनलाईन पेटीएम, पे यु पेमेंट्स, विप्स पेमेंट या वॉलेटला एका २,७२,८१०/- रुपये ट्रान्सफर करुन आर्थिक फसवणुक केल्याचे रमेश जोशी यांना कालांतराने लक्षात आले. त्यामुळे त्यांनी सायबर पोलीस स्टेशन पुणे यांचेकडे तक्रार नोंदविली होती. ती पुढील तपास करीता समर्थ पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आली. यानुसार समर्थ पोस्टे पुणे येथे गुन्हा रजि. नं. २८७/२०१९ भादवि.४१९,४२०,५०४,३४ माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ सी, डी प्रमाणे गुन्हा नोंद झाला होता. यातील आरोपी याचेवर इतरही लोकांचे कर्ज झालेले असल्याने तो लपून ठपून रहात होता. पोलीस निरीक्षक श्री. विनायक साळुके , गुन्हे समर्थ पोस्टे , पोशि. गणेश शेंडे व पोशि. सचिन गोरखे यांनी श्री. बाळकृष्ण कदम , वरिष्ठ पोलीस निरीक्षक , समर्थ पोलीस ठाणे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली त्याचा माग काढून त्यास दिनांक २५/९/२०१९ रोजी गुन्हयात अटक केली आहे.

हॉटेल मॅनेजर याने ग्राहकांवर दर्शविलेले फाजील आत्मविश्वासामुळेच आरोपीने त्यांचे मोबाईल फोन बँकींग सुविधा व फोन मध्ये सेव्ह केलेले कार्ड डिटेल्स यांचा गैरवापर केला असल्याचे तपासात आढळून आले आहे.

--------------